**राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत नदी पात्रामधील काढलेल्या गाळाची विल्हेवाट लावण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: गौखनि-१०/०३२५/प्र.क्र.५२/खनिज-१,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,**
**दिनांक : ३१ जुलै, २०२६**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३.
२) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक :- नदिगा २०२२/ प्र.क्र. (२९९/२०२२) सि.व्य.(म), दिनांक २५.०७.२०२३

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ मधील कलम १९,२० व २१ मधील तरतूदीनुसार अधिसुचित नदी, ओढा किंवा जलनि:स्सारणाचा नैसर्गिक मार्ग यामध्ये होणारे अडथळे दूर करण्याचे अधिकार जलसंपदा विभागास आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये पावसाळयात व बारमाही वाहणाऱ्या प्रमुख नद्या व उपनद्या असून, दरवर्षी पावसाळयात या नद्यांना लहान मोठ्या प्रमाणात पूर येत असतो. या पूरामुळे आजू-बाजूच्या नागरी व शहरी भागांमध्ये पाणी पसरुन दरवर्षी आर्थिक नुकसान होत असते.

राज्यातील प्रमुख नद्यांच्या लांबीपैकी शहरी/नागरी वसाहतीतून प्रवाहीत होणा-या एकूण १६४८.८३ कि.मी. लांबीमध्ये लाल व निळया पूर रेषांची आखणी जलसंपदा विभागामार्फत करण्यात आली असून सदर नद्यांमधून गाळ काढण्याबाबत जलसंपदा विभागाने दिनांक २५ जुलै २०२३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुन:स्थापित करण्याचे धोरण व कार्यपद्धती निश्चित केली आहे.

नदी पात्रातील गाळ व राडारोडा तसेच नदी पात्रात गाळामुळे निर्माण झालेली बेटे, नदीपात्रातील अडथळे इत्यादी निष्कासित करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी संघटनेमार्फत / अशासकीय संस्थेच्या मदतीने (NGO) / खाजगी कंपन्यांकडून CSR फंडातून करण्यात येणार आहे, असे दिनांक २५.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

सदर धोरणामध्ये "गाळाची विल्हेवाट लावण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करणेसाठीची मार्गदर्शक तत्वे स्वतंत्रपणे महसूल विभागामार्फत निर्गमित करण्यात येतील." असे नमूद केले आहे. सदर प्रकरणी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व विधि व न्याय विभागाने दिलेले अभिप्राय विचारात घेता त्यानुसार जलसंपदा विभागाने नदीपात्राच्या maintenance, upkeep and disaster management या उद्देशासाठी निष्कासित केलेल्या गाळामधील गौण खनिजाची विल्हेवाट लावण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१) २५ जुलै २०२३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुनःस्थापित करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत नदीपात्रामधील अडथळे दूर करताना निघणाऱ्या गाळामध्ये गौण खनिज (गाळ, माती, गाळ मिश्रीत वाळू, वाळू , दगड, गोटे) व गौण खनिजेइतर बाबी एकत्रितरित्या असू शकतात.

**२)** केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.३०.०८.२०२३ रोजी प्रसिद्ध अधिसूचनेनुसार नदीतील गाळ निष्कासनाबाबत व विल्हेवाटबाबत पर्यावरण विषयक दक्षतेबाबतची (**Enviromental safeguards** ) जबाबदारी जलसंपदा विभागाची राहील.

**३)** नदीपात्रामधून निघणारा गाळ, माती, गाळ मिश्रीत वाळू, वाळू , दगड, गोटे हे गौण खनिज मौल्यवान संसाधन असून त्याचा शेती, गृहनिर्माण, रस्ते, तटबंदी, खाण भरणी आणि बांधकामे या कामांमध्ये फायदेशीर वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे जलसंपदा विभागाने वरीलप्रमाणे कार्यवाही करताना निघणाऱ्या गाळामधील गाळ, माती, गाळ मिश्रीत वाळू, वाळू, दगड, गोटे इत्यादी गौण खनिजाचे पृथक्करण करुन ठेवावे. ही कार्यवाही जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.नदीखो-२०२२/(प्र.क्र.२७४/२२)/सिंव्य (म) दि.१५ ऑक्टोबर, २०२४ मधील मुद्दा क्र.५.३ नुसार काढलेल्या गाळाच्या प्रतवारीनुसार नोंदी अंतर्गत परिशिष्ट-२ मधील प्रपत्र -४ मध्ये गाळाची प्रतवारी नमूद करण्याच्या सूचनेनुसार जलसंपदा विभागाने अथवा या कामासाठी नियुक्त अशासकीय संस्थेने (**NGO**) करावी.

**४)** जलसंपदा विभागाने पृथकरण केलेल्या गौण खनिजाच्या साठवणूकीसाठी जिल्हाधिकारी यांनी सुयोग्य शासकीय जागा उपलब्ध करुन द्यावी.

५) जलसंपदा विभागाने पृथक्करण केलेल्या गाळ, माती, गाळ मिश्रीत वाळू, वाळू, दगड, गोटे इत्यादीची स्वतंत्र **ETS** मोजणी करुन परिमाण निश्चित करण्यात यावे. उक्तबाबतचे पंचनामे करुन सदर गौण खनिजाचा ताबा जलसंपदा विभागाने महसूल विभागास जिल्हाधिकारी नियुक्त करतील अशा अधिकाऱ्यास द्यावा. सदर गौण खनिजाचा ताबा महसूल विभागास प्राप्त होईपर्यंत त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची अथवा संबंधित कार्यकारी अभियंता

(जलसंपदा) यांची व त्यांच्या नियंत्रणाखाली या कामासाठी नियुक्त अशासकीय संस्थेची (**NGO**) राहील.

६) गौण खनिजाचा ताबा प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सदर गौण खनिजाची नोंद महाखनिज प्रणालीवर घ्यावी.

**७)** जलसंपदा विभागाने काढलेल्या व पृथक्करण केलेल्या गाळ, माती, दगड, गोटे इत्यादी गौण खनिजाची विल्हेवाट जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागामार्फत खालीलप्रमाणे लावावी:-

**a.** खोलीकरणाद्वारे निघणारा गाळ व माती याबाबतची नोंद तहसिलदार यांनी घेऊन प्राधान्याने त्या तालुक्यातील व त्यानंतर जवळच्या तालुक्यातील/ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावा. गाळ व माती गाडीमध्ये भरणे व त्याची वाहतूक करण्याची जबाबदारी संबंधित शेतकऱ्याची राहील. गाळाच्या वाहतूकीसाठी जिल्हाधिकारी यांनी झिरो रॉयल्टी पासेस उपलब्ध करुन द्यावेत.

**b.** नदीच्या खोलीकरणाद्वारे निघणारे दगड व गोटे प्राधान्याने त्या जिल्ह्यातील पाणंद रस्त्याकरीता व त्यानंतर इतर रस्ते बांधकामाकरीता आणि शासकीय कामाकरीता विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत. त्याची नोंद संबंधित बांधकामाच्या देयकामध्ये घेण्यात यावी. या सामग्रीचा खर्च देयकातून वजा करुनच देयके मंजूर करावीत. याची जबाबदारी देयक मंजूर करणाऱ्या संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

**c.** गाळाची विल्हेवाट लावताना त्याचा पर्यावरण, सामाजिक आणि जलस्रोत यावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

**d.** जलसाठे, दलदलीच्या परिसंस्था पर्यावरणीय दृष्ट्या महत्वाच्या आहेत. त्यामुळे गाळामधून निघणारे गौण खनिज जलसाठे, दलदलीच्या परिसंस्था यामध्ये टाकण्यात येऊ नये.

८) जलसंपदा विभागाने राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुनःस्थापित करण्यासाठी गाळाचे उत्खनन करताना **पर्यावरण अनुमती घेतली नसल्यास** नदीपात्राच्या maintenance, upkeep and disaster management या उद्देशासाठी निष्काषित केलेल्या गाळामधील पृथक्करण केलेल्या गाळ मिश्रित वाळू व वाळूची विल्हेवाट जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे लावावी :-

**a.** नदीच्या खोलीकरणाव्दारे निघालेल्या गाळामधील गाळ मिश्रित वाळू आणि वाळू विविध घरकूल योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना (पाच ब्रास मर्यादेत) विनामुल्य वाटप करावी. वाळू गाडीमध्ये भरणे व त्याची वाहतूक करण्याची व्यवस्था लाभार्थ्यांची राहील.

b. घरकूल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन दिल्यानंतर शिल्लक वाळू स्वामित्वधन आकारुन शासकीय कामाकरीता संबंधित विभागाच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी. तथापि, ज्या कामाकरीता वाळू उपलब्ध करुन दिली जाणार आहे त्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये नमूद वाळूचा दर हा स्वामित्वधनाच्या दरापेक्षा जास्त असल्यास यामधील तफावतीची रक्कम देयकातून वजा करुनच देयके मंजूर करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

c. वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही शिल्लक राहिलेली वाळू पुढील ३ वर्षासाठी घरकूल व शासकीय कामाची मागणी विचारात घेता त्यासाठी जिल्हाधिकारी यांनी साठा करुन ठेवावा.

९) जलसंपदा विभागाने राज्यातील नागरी व शहरी क्षेत्राच्या लगत वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहन क्षमता पुनःस्थापित करण्यासाठी गाळाचे उत्खनन करताना पर्यावरण अनुमती घेतली असल्यास, निष्काषित केलेल्या गाळामधील पृथक्करण केलेल्या गाळ मिश्रित वाळू व वाळूची विल्हेवाट खालीलप्रमाणे लावावी:-

a. जलसंपदा विभागास अथवा यासाठी नेमलेल्या संस्थेस वाळूचा व्यावसायिक वापर करण्याबाबत जलसंपदा विभागाने निर्णय घ्यावा. नदीपात्रातील गाळ व गाळमिश्रीत वाळू निष्कासन करताना निघालेल्या गौण खनिजाचा व्यावसायिक वापर होणार असल्याने प्रकरणी पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतली आहे का ? याची खात्री जलसंपदा विभागाने करावी.

b. जलसंपदा विभागाने पृथक्करण केलेल्या गाळ मिश्रित वाळू व वाळूच्या परिमाणाइतके पासेस उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी नोंदवावी.

c. तद्नंतर, संबंधित कंत्राटदार/ कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी प्रचलित दराने आवश्यक शुल्क (स्वामित्वधन, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व इतर शुल्क) अदा केल्यानंतर तितक्या परिमाणाचे बारकोडयुक्त पास "महाखनिज" या संगणक प्रणालीवर नोंद घेवून जिल्हाधिकारी यांनी जलसंपदा विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांना उपलब्ध करुन द्यावे. याबाबतची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता जलसंपदा यांची राहिल.

d. जलसंपदा विभागामार्फत नेमलेल्या संस्थेस वाळूचा व्यावसायिक वापर करावयाचा असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित संस्थेस साठा व विक्री परवाना द्यावा.

e. नदीच्या खोलीकरणाव्दारे निघालेल्या गाळामधील उपलब्ध होणाऱ्या वाळुच्या १० टक्के वाळू ही घरकुल व स्थानिक वापराकरिता तसेच ग्रामपंचायत/ नगरपंचायत/नगरपरिषद क्षेत्रामधील शासकीय बांधकामाकरिता राखीव ठेवावी.घरकुल धारकांकडून स्वामित्वधन घेण्यात येवू नये. स्थानिक वापराकरिता स्वामित्वधन घेण्यात यावे.

f. वाळू साठा केलेल्या गटाचे Geo- fencing करणे बंधनकारक राहील व सदर Geo- fencing च्या चतु:सिमांचे Geo- Cordinates जिल्हाधिकारी यांना जलसंपदा विभागाने उपलब्ध करुन द्यावेत.

g. प्रत्येक वाळूगटाच्या/साठ्याच्या ठिकाणी २४X७ छायाचित्रण होण्यासाठी कंत्राटदारामार्फत CCTV बसविण्यात यावेत. बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. कंत्राटदाराने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.तसेच, सीसीटीव्हीच्या आधारे वाळू उत्खननावर संनियंत्रण करण्याकरिता सर्वसामान्य नागरिकांसाठी Access उपलब्ध करुन देण्यात यावा.

h. वाळू साठ्यामधून वाळू वाहतूक करताना ज्या वाहनातून वाळूची वाहतूक होणार आहे त्याचा वाहतूक पास (eTP क्रमांक नमूद करुन) महाखनिज प्रणालीमार्फत वाळूसाठ्याच्या Geo- fencing च्या क्षेत्रामध्ये तयार करण्यात यावा.

i. रियल टाईम मॉनिटरिंग करण्यासाठी वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास महाखनिज प्रणालीशी संलग्न केलेले GPS यंत्र लावणे अनिवार्य राहील.

j. अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार / लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम ४८(८) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतुकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

k. वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणी विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत, शासन परिपत्रक क्र. गौखनि-१०/०५२५/प्र.क्र.१७९/ख-२, दिनांक ११ जुलै, २०२५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करावी.

l. Automotive Research Association of India (ARAI) द्वारे प्रमाणित Automotive Industry Standard 140 IRNSS (AIS-140

IRNSS) प्रमाणके असलेला GPS Devices गौण खनिजाच्या वाहतूक करणाऱ्या वाहनांना बसविणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय जलसंपदा विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७३११३२०३६९१४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.07.31 13:22:10 +05'30'

**(डॉ. उमेश ध. राठोड)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क ,क्रिडा व अल्पसंख्याक) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
९) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
११) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) निवडनस्ती "खनिज-१ कार्यासन.